वर्ष- १२ ■ अंक- १४ ■ मुंबई, मंगळवार,१७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

घरच्या घरी बदामापासून बनवा वॉटरप्रुफ आयलायनर

3 ध्वनिप्रदूषणाला धर्माचा रंग कशाला?

बारवीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com


महाराष्ट्राच्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले 'हे' महत्वाचे निर्णय



मुंबई।

- नाबार्डकडून जलसंपदा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पंधरा हजार कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज. यातून ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प व १९३ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यात येणार. राज्यातील ८ लाख हेक्टर कृषि क्षेत्राला सिंचन सुविधा निर्माण होण्याने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार. **(जलसंपदा विभाग)**
- कोल्हापूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम होणार. मौजे विकासवाडी (ता. करवीर) १२ हेक्टर ७६ आर शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास मंजुरी. कोल्हापुरच्या क्रिडा विकासाला चालना मिळणार. **(महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)**
- पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना. प्रकल्पाला गती देण्यासाठी, भुसंपादन व अनुषांगिक बाबींसाठी सहा हजार कोटींचे कर्ज. एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांची सहभागीदारी, त्यांच्याकडे भागीदारीनुसार कर्ज फेडीची जबाबदारी. या कजार्ला शासन मान्यता व हमी देण्यास मान्यता. **(उद्योग विभाग)**
- राज्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान' राबविणार. गावपातळीवर आरोग्य सुधारणा घडवून आणण्यावर भर. ग्रामपंचायतीली राज्यस्तरीय पुरस्कारासाठी पाच ते २ कोटी रुपयांचा पुरस्कार. ग्रामपंचाय ते जिल्हापरिषद स्तरापर्यंत पुरस्कार. जीवनशैलीत, आहारात बदल करण्यासाठी प्रोत्साहन, प्रतिबंधात्मक उपाययोजना, वेळेवर उपचार व पुनर्वसन हे अभियानाचे चार स्तंभ. राज्यस्तरापासून उपक्रेंद्र- ग्रामस्तरापर्यंतचे नियोजन. आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत अभियान कालावधी. अभियानाकरिता दरवर्षी ८० कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद. **(सार्वजनिक आरोग्य विभाग)**
- पुणे जिल्ह्यातील रत्नपुरी मळा (ता. इंदापूर) येथील एमआयडीसीला जमीन मिळणार. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची रत्नपुरी मळ्यातील एक हजार एकर जमीन नविन औद्योगिक वसाहतीसाठी एमआयडीसीला हस्तांतरीत होणार. उद्योजकांसाठी दिलासा, गुंतवणूक व रोजगार संधी निर्माण होणार **(महसूल विभाग)**
- मुंबईत मौजे कोलेकल्याण (ता. अंधेरी) येथे महाटेनिस फाऊंडेशनच्या माध्यमातून पायाभूत सुविधा. टेनिस खेळाला प्रोत्साहन, खेळाडुंना सुविधा निर्माण होणार. यासाठी म्हाडाच्या भुखंडांवर माध्यमातून संयुक्त भागीदारी तत्वावर विकास योजना राबविण्यास मंजुरी. **(गृहनिर्माण विभाग)**
- अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू (मुंबई पारबंदर प्रकल्प) प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्राकरीता नियुक्त नव नगर विकास प्राधिकरण क्षेत्रात तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विकास प्रकल्पासाठी भूसंपादन व भूवाटपाच्या धोरणास मान्यता. तिसरी मुंबईच्या दिशेने वाटचालीस गती मिळणार. **(नगर विकास)**
- राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ. विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर यांना मिळणार वाढीव बक्षीस. **(शालेय शिक्षण)**
- महाराष्ट्र सार्वजनिक - खासगी भागीदारी (पीपीपी) धोरण झ २०२६ जाहीर. वित्तीय मुल्य २५ कोटीहून अधिक असेल, अशा सार्वजनिक - खासगी भागीदारी प्रकल्पांना मंजूरी देण्याचे अधिकार मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीला. नियोजन विभागात यासाठी स्वतंत्र कार्यासन निर्मितीस मान्यता **(नियोजन विभाग)**
- ईलेक्ट्रॉनिक माध्यमातून ई-मेलद्वारे बजावण्यात आलेली नोटीसही कायदेशीर. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २३०- (नोटीस बजाविणेची रित) मध्ये इलेक्ट्रानिक मेलव्दारे नोटीस बजाविण्याच्या नियमात दुरूस्ती. **(महसूल विभाग)**
- परभणी जिल्ह्यातील इंद्राणी सहकारी सूतगिरणीला (ता. मानवत) शासन अर्थसहाय्य मिळणार **(वस्त्रोद्योग विभाग)**
- राज्यात अपर जिल्हाधिकारी यांच्या ११ पदांच्या निर्मितीस मान्यता. जिल्ह्यांचे भौगिलिक क्षेत्र, वाढलेली लोकसंख्या व अंतर विचारात घेता विविध सेवा जलद मिळाव्यात यासाठी उच्च स्तरीय समितीच्या शिफारशीनुसार पद निर्मिती. **(महसूल व वन विभाग)**
- नागपूर जिल्ह्यातील मौजा लिंगा (ता. कळमेश्वर) येथे कोल टू केमिकल प्रकल्पासाठी ११७ हेक्टर १९ आर जमीन एमआयडीसीला उपलब्ध करून देणार. **(महसूल विभाग)**
- बारामती जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत मौजे कटफळ येथील क्रीडा सुविधांसाठी ७५ कोटी १३ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता. यातून ८० हजार चौरस मीटरवर पॅव्हेलियन, जलतरण तलाव, स्केटिंग रिंग, आर्चरी रेंज, बास्केटबॉल मैदान अशा सुविधा उभारण्यात येणार **(शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)**
- सुधारित धान्य वितरण प्रणालीत अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करण्यासाठी वाहतूक कंत्राटे निश्चितीसाठी एकाच वेळी निविदा प्रक्रीया राबविण्यास मान्यता. यामुळे मुंबई झ ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ५ परिमंडळे व ३४ जिल्ह्यांमधील वितरण प्रणाली सक्षम होणार, यात सुसूत्रता येणार **(अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग)**
- अकोला जिल्ह्यातील पिंपळशेंडा (ता. मुर्तिजापूर) येथील लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या ६ कोटी ६० लाख रुपयांच्या दुरूस्ती अंदाजपत्रकास मंजुरी. यामुळे २५५ हेक्टरला सिंचन उपलब्ध होणार **(मृद व जलसंधारण विभाग)**
- महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेशास मंजुरी **(वित्त विभाग)**
- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील १०९ (३) (घ) मध्ये सुधारणेस मान्यता. **(उच्च व तंत्र शिक्षण)**
- महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा करण्यास, त्याबाबतच्या अध्यादेशास मान्यता. **(उच्च व तंत्र शिक्षण विभाग)**

१५० पोलीस, सर्व रस्ते बंद अन्...
पुण्यात रात्री १२ ते पहाटे ३ दरम्यान काय घडलं?



ऑपरेशनचा मुख्य हेतू काय होता?

या धडक मोहिमेमागे पोलिसांचे तीन मुख्य उद्दिष्ट होते. ज्या अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने किंवा फसवणूक करून वेश्याव्यवसायात ढकलणाऱ्या दलालांचा शोध घेणे, वस्तीमध्ये छुप्या पद्धतीने चालणाऱ्या अमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदा राहणाऱ्या परदेशी नागरिकांची (प्रामुख्याने बांगलादेशी) ओळख पटवणे, असे तीन मुख्य उद्देश होते.

पुणे। पुण्यातील बुधवार पेठ या वेश्यावस्तीत बुधवारी मध्यरात्री पुणे पोलिसांनी एकाच वेळी धडक कारवाई केली. त्यामुळे संपूर्ण परिसराची नाकाबंदी करण्यात आली होती.

रात्री १२ वाजता सुरू झालेली ही मोहीम पहाटे ३ वाजेपर्यंत सुरु होती. गुन्हे शाखेचे अधिकारी, स्थानिक पोलीस आणि महिला पोलिसांचा मोठा फौजफाटा अचानक गल्लीबोळांत शिरल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. यावेळी ५० हून अधिक कुंटणखान्यांची झडती घेत पोलिसांनी संशयितांची कसून चौकशी केली.

निलंबनाच्या कारवाईनंतर पोलीस आक्रमक

काही दिवसांपूर्वी फरासखाना पोलीस ठाण्यातील एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने एका बांगलादेशी तरुणीला वाचवण्यासाठी पैशांची देवाणघेवाण केल्याचा आणि वरिष्ठांपासून माहिती लपवल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणात त्या कर्मचाऱ्याचे निलंबन करण्यात आले होते. यानंतर आता पुणे पोलीस आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बुधवार पेठेतील अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी हे कॉम्बिंग ऑपरेशन आखले.

गल्लीगल्लीत नाकाबंदी आणि सर्च मोहीम

रात्री १२ च्या सुमारास गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी बुधवार पेठेला चारही बाजूंनी वेढा घातला. बुधवार पेठेत येणारे आणि जाणारे सर्व रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले. प्रत्येक दुचाकी आणि संशयित व्यक्तीची तपासणी करण्यात आली. पोलिसांनी या कारवाईत ५० पेक्षा अधिक संशयित घरे आणि कुंटणखान्यांच्या खोल्यांची तपासणी केली. यात प्रामुख्याने मानवी तस्करी आणि अमली पदार्थांच्या साठ्याबाबत शोध घेण्यात आला. तसेच परिसरात विनाकारण वावरणाऱ्या आणि संशयास्पद हालचाली करणाऱ्या तरुणांची अंगझडती घेण्यात आली.

शुक्रवार पेठ चौकीजवळ सखोल चौकशी

याप्रकरणी शुक्रवार पेठ पोलीस चौकीच्या आसपास असलेल्या संवेदनशील भागात महिला पोलिसांनी कुंटणखान्यातील महिलांशी संवाद साधून त्यांच्याकडून माहिती गोळा केली. या मोहिमेत गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह स्थानिक पोलीस ठाण्याचे निरीक्षक आणि सुमारे १५० हून अधिक पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगरमध्ये मंडप सजलेला, अल्पवयीन नवरीची मेकअपची तयारी अन्...

बालविवाह रोखण्याचा थरार

छत्रपती संभाजीनगर।

काही बोलावं, कसं सांगावं? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. कारण छत्रपती संभाजीनगरमध्ये एका अल्पवयीन मुलीचा विवाह केला जात होता. पोलिसांनी वेळीच हे लग्न रोखल्याने मुलीचं आयुष्य सुधारलं आहे. पण हे लग्न करण्यामागे मुलीच्या आईने तिच्या सुरक्षेचं कारण सांगितलं आहे. आपण धुणी-भांडी करायला जातो. घरी कुणी पुरुष नाही. आपण कामावर गेल्यावर मुलगी घरी एकटी कशी राहणार? अशा विचारातून आपण मुलीचं लग्न लावत असल्याचं महिलेने म्हटलं.

पण पोलीस आणि दामिनी पथकाने अल्पवयीन मुलीचं लवकर लग्न केल्याने तिच्या आयुष्यावर किती वाईट परिणाम होणार, याबाबत माहिती दिली. पोलीस आणि दामिनी पथकाच्या धाडीमुळे बालविवाह रोखण्यात आला.

पोलीस आणि समितीने दिले अभय...

महिला व बालविकास समितीच्या आम्रपाली बोर्डे यांनी पालकांचे लेखी जबाब घेतले. मुलीचे वय पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणे हा केवळ कायद्याने गुन्हाच नाही, तर मुलीच्या आरोग्यासाठीही घातक असल्याचे त्यांना पटवून देण्यात आले. दामिनी पथकाने दोन्ही कुटुंबांचे समुपदेशन करून त्यांना कडक समज दिली. दहावीत शिकणाऱ्या त्या मुलीला आता बालविवाहाच्या बेडीतून मुक्त करून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाणार आहे.



नेमकं प्रकरण काय?

बीड बायपास रोडवरील शुभम लॉन्स येथे आज १२ फेब्रुवारीला एका विवाह सोहळ्याची जय्यत तयारी सुरू होती. मंडप सजला होता, पाहुण्यांची लगबग सुरू होती आणि नवरी मुलगी लग्नासाठी नटून-थटून तयार होती. तिचा मेकअप सुरू असतानाच, महिला व बालविकास समितीच्या सदस्य आम्रपाली बोर्डे यांना या विवाहाबद्दल खात्रीशीर माहिती मिळाली. त्यांनी तातडीने दामिनी पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक कांचन मिरधे यांना पाचारण केले.

मांडवात पोलीस पोहोचले अन...

कांचन मिरधे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल निर्मला निंभोरे, कविता गवळी, मोनिका दिवे, सुनिता नागलोद आणि बीट मार्शलचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नवरी मुलीचे आधार कार्ड तपासले असता सर्वांनाच धक्का बसला. नवरी मुलगी केवळ १७ वर्ष ६ महिन्यांची असल्याचे निष्पन्न झाले. अवघ्या सहा महिन्यांनंतर ती सज्ञान होणार होती, मात्र त्याआधीच तिच्यावर संसाराचं ओझं टाकलं जात होतं.

असुरक्षिततेच्या भीतीपोटी लग्नाचा घाट....

मुलीच्या आईने आपली भूमिका मांडताना सांगितले की, त्या मुंबईत धुणी-भांडी करून उदरनिर्वाह करतात. घरात पुरुष माणूस नसल्याने आणि कामाच्या निमित्ताने घराबाहेर राहावे लागत असल्याने, मुंबईसारख्या ठिकाणी मुलीला एकटे सोडणे त्यांना सुरक्षित वाटत नव्हते. याच भीतीपोटी त्यांनी संभाजीनगरमधील एका २२ वर्षीय रिक्षाचालक मुलाशी तिचे लग्न ठरवले होते. लग्नासाठी सर्व तयारी झाली होती, आहेराची भांडीकुंडी लावली होती, मात्र कायद्याच्या सतर्कतेने हा अनर्थ टळला.

जावयाने सासूवर लैंगिक अत्याचार करत घरातच संपवलं...

मुंबई । जावयानेच आपल्याच सासूवर लैंगिक अत्याचार केले आणि नंतर तिचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मुलीने आपल्याच नवऱ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत प्रकरणाचा तपास सुरु केला. या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने दारूच्या नशेतच असे कृत्य केलं असावं अशी माहिती समोर आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना 8 फेब्रुवारी रोजी रात्री कुलावर्ती मंडल येथे घडली. हा प्रकार घडला तेव्हा वृद्ध महिला घरात एकटीच होती. आरोपीची पत्नी आणि पीडित मुलीने दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं की, सुमारे 40 वर्षांचा आरोपी हा कामगार आणि मद्यपी आहे. तक्रारीनुसार त्याने त्याच्या सासूवर घरातच लैंगिक अत्याचार केला आणि नंतर तिला संपवलं.

मृत्यूचे नेमकं कारण काय? तपास सुरु

संबंधित प्रकरणात पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, आरोपीने वृद्ध महिलेवर हल्ला केला असावा, ज्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मृत्यूचे नेमकं कारण काय याचा तपास सुरु आहे. नंतर पोलिसांनी असं देखील सांगितलं की, आरोपीने दारूच्या नशेत असताना हा गुन्हा केल्याची शक्यता आहे. तक्रारीच्या आधारे, कुलवाकुर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आणि आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

आधी प्रेयसीला संपवलं
अन् मग तिच्याच ओढणीने गळफास घेतला



मुंबई । एका तरुणाने आपल्या प्रेयसीची हत्या करुन स्वतःही आपले जीवन संपवले आहे. सुनील आणि सिमरन असे या मृत जोडप्याचे नाव आहे. सोमवारी (९ फेब्रुवारी) रात्री या दोघांनी एकत्र मद्यप्राशन केले होते. यानंतर या दोघांमध्ये कडाक्याचा वाद झाला. या वादानंतर सुनीलने सिमरनचा गळा दाबून खून केला आणि यानंतर सिमरनच्याच ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. सिमरनच्या गळ्यावर खुणा आढळल्याने तिची गळा दाबून हत्या करण्यात आली असावी, असा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. हरियाणातील सिरसा येथील ही घटना आहे.

छत्रपती संभाजीनगर हादरलं... सहावीत शिकणाऱ्या चार विद्यार्थ्यांचा वर्गमित्रावर अत्याचार

त्रिस्तरीय समितीकडून चौकशी

हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानं त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून प्रकरणाची चौकशी सुरू केली. मात्र शाळेकडून संबंधित मुलांवर कोणतीही कारवाई केली नसल्याचा आरोप पीडित मुलाच्या वडिलांनी केला. उलट पीडित मुलावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संबंधित मुलाच्या वडिलांनी केला. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसेंनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. दादा भुसे म्हणाले की, या संदर्भात मी स्वतः माहिती घेणार आहे आणि त्यावर योग्य ती करेन. शिक्षण विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून यामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाई करणार आहे.

छत्रपती संभाजीनगर। अत्याचार करणाऱ्या चार मुलांवर शाळा प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, उलट तक्रार करणाऱ्या पीडित मुलावर दबाव आणल्याचा आरोप करण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील एका नामांकित इंग्रजी शाळेमध्ये चार मुलांनी त्यांच्याच वर्गमित्रावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हे सर्व विद्यार्थी सहावीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत. सप्टेंबर महिन्यामध्ये ही घटना घडल्याची माहिती पीडित मुलाच्या पालकांनी दिली. याप्रकरणी 4 मुलांविरोधात फुलंब्री पोलीस ठाण्यात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून प्रकरणाची चौकशी सुरू केली. दुसरीकडे, शाळेने मात्र संबंधित मुलांवर कोणतीही कारवाई केली नाही. उलट पालकांवरच दबाव आणल्याची माहिती समोर आली आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घडलेला हा धक्कादायक प्रकार जेव्हा एबीपी माझानं समोर आणला तेव्हा अख्खा महाराष्ट्र हादरला. पीडित विद्यार्थी हा सहावीतला आहे आणि त्याच्याच वर्गातल्या विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात त्याच्यासोबत हे दुष्कृत्य केलं आहे.

संगतीमुळे मुलं बिघडतात

पण शाळकरी मुलांमध्ये अशा प्रकारची विकृत मानसिकता येते कुठून असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर मानसोपचार तज्ज्ञ किशोर शितोळे यांनी सांगितलं की, "मोबाईलचा अतिवापर, पॉर्न व्हिडीओ पाहणे, एका विशिष्ट विचारसरणीच्या मुलांच्या एकत्र ग्रुप होणे, अशा कारणामुळे या घटना घडू शकतात. यावर उपाय म्हणजे पालकाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे."



सध्या आरोप असलेल्या चार अल्पवयीन मुलांवर पॉक्सोअंतर्गत गुन्हा

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६



फास्टफूड खाताय तर व्यायाम करा...नाही तर

फास्ट फूड खाणाऱ्यांची संख्या वाढलीय. भूक लागली म्हणून पिज्झा बर्गर खाल्ला यापेक्षा फॅशन म्हणून आजकाल पिज्झा बर्गर आणि फ्रेंच फ्राईज खाल्ल्या जातात. पण फास्ट फूड खाल्ल्यानं तरुणाईत लठ्ठपणा वाढतो. जर तुम्हाला फास्ट फूड खाऊन त्याचे दुष्परिणाम नको असतील तर तेवढा व्यायामही करणं गरजेचं आहे. इंग्लंडमधील लॉफबर्ग विद्यापीठानं केलेल्या एका अभ्यासाअंती तुम्ही फास्ट फुड खाल्ल्यावर किती व्यायाम करायला हवा याची यादीच जाहीर केली.

तुम्ही जर एक पिज्झा खाल्ला तर त्यातील कॅलरी बर्न करण्यासाठी तुम्ही ४ तास धावलं पाहिजे. तुम्ही ५०० मिली पिनट बटर खाल्ल्यावर अडीच तास धावलं पाहिजे. ११० ग्रॅम चॉकलेट खाल्ल्यावर १ तास धावलं पाहिजे.

चिकन सँडविच खाल्ल्यावरही तुम्ही एक तास धावलं पाहिजे. १ लिटर कोल्ड ड्रिंक प्यायल्यावर ३० मिनिटं धावायला पाहिजे. चिप्स खाल्ल्यावर २० मिनिटं धावणं गरजेचं आहे. एक कप चहा प्यायल्यानंतर ६ मिनिटं चालणं गरजेचं आहे.

हल्लीच्या तरुणाईसाठी फास्ट फूड खाणं खूप सोप्पं आहे. पण व्यायामाला त्यांच्याकडं वेळ नाही.

फास्ट फूड खाल्लं तर किती व्यायाम करावा हा तक्ता दिसायला बरा वाटतो. पण तो कुणालाही पाळता येणार नाही. त्यामुळं शक्यतो फास्ट फूडच टाळावं असा सल्ला डॉक्टर देतात.

फास्ट फूडमुळे लोकांमध्ये लठ्ठपणा वाढत चाललाय. सध्या जगात १५ कोटी मुलं आणि तरुणाई लठ्ठपणाच्या विळख्यात सापडलीय.

फास्ट फूड खाणं असंच सुरू राहिलं तर येत्या १० वर्षात लठ्ठपणाच्या विळख्यात

घरच्या घरी बदामापासून बनवा वॉटरप्रुफ आयलायनर



तुम्हाला घरच्या घरी काही गोष्टी करुन पाहायला आवडत असतील तर तुमच्यासाठी आम्ही आज खास एक उक्क रेसिपी आणली आहे. तुमच्या डोळ्यांचे सौंदर्य वाढवणाऱ्या आयलायनरचा वापर करायला तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही घरच्या घरी आयलायनर बनवू शकता तेही वॉटरप्रुफ... हे वॉटरप्रुफ आयलायनर बनवण्यासाठी आपण करणार आहोत बदामाचा वापर...मग आता हे आयलायनर कसे बनवायचे ते जाणून घेऊया.

घरच्या घरी बदामाचे आयलायनर बनवण्यासाठीची कृती - साधारण एक वाटीभर बदाम तुम्ही घेतले तर तुम्हाला यापासून भरपूर आयलायनर बनवता येईल. यासाठी तुम्हाला एखादे असे भांडे लागेल जे काळे झाले तरी तुम्हाला फरक पडणार नाही. बदाम छान कुटून घ्या. एका भांड्यात बदाम घेऊन त्यामध्ये जाळ पेटवा.(तुम्ही एक एक बदामही जाळून घेऊ शकता. पण त्यामध्ये वेळ लागतो.) बदामातून छान धूर येऊ लागल्यानंतर आणि ते काळे होईपर्यंत तुम्हाला ते काळे होऊ द्यायचे आहेत. बदाम छान खरपूस जळाल्यानंतर तुम्हाला ते बारीक वाटून घ्यायचे आहेत. असे करताना तुमच्या बदामाचे तेल वर येईल.

त्यामुळे त्यामध्ये थोडा ओलसरपणा नक्कीच येईल. पण याला अधिक स्मुथ आणि छान करण्यासाठी तुम्ही त्यामध्ये अगदी थोडसे ॲलोवेरा जेल घाला. असे करताना तुम्ही ते फार पातळ होणार नाही याची काळजी घ्या तयार आयलायनर तुम्हाला ब्रशच्या मदतीने लावता येईल. हे आयलायनर जर तुम्ही नीट वापरले तर ते चांगले टिकू शकते. आयलायनरमध्ये बदामाचे तेल असल्यामुळे ते आयलायनर निघत नाही. ते छान टिकून राहते आणि त्याचा कोणताही साईड इफेक्ट होत नाही. तयार आयलायनर एका एअरटाईड कंटेनरमध्ये भरुन ठेवा. तुम्ही हे आयलायनर फ्रिजमध्ये ठेवले तरी तुम्हाला चालू शकेल.

आयलायनर जास्त काळ टिकवण्यासाठी तुम्ही वापरत असलेला ब्रश कायम स्वच्छ वापरा. आता तुम्ही आयलायनर वापरताना किंवा करताना एका गोष्टीची काळजी घ्यायला हवी ते म्हणजे आयलायनर चांगले बारीक वाटले गेले पाहिजे. कारण आयलायनर स्मुथ आणि चांगले लागले गेले नाही तर ते अजिबात चांगल दिसत नाही. तुम्ही याचा वापर काजळ म्हणून ही करु शकता. हे काजळ ऑरगॅनिक असल्यामुळे तुम्हाला त्याचा त्रास होत नाही.

'ही' लक्षणं दिसली तर वेळीच सावध व्हा लिव्हर खराब होण्याचे असू शकतात संकेत



शरीराचं कार्य सुरळीत व्हावं यासाठी अनेक अवयव महत्त्वाची भूमिका बजावतात. अशातच लिव्हर शरीराचा एक महत्त्वपूर्ण भाग असून त्याला यकृत असंही म्हटलं जातं. जर लिव्हरचं आरोग्य बिघडलं तर मृत्यू होण्याचाही धोका संभवतो. लिव्हरचं काम पचनक्रियेशी निगडीतही असतं. लिव्हरचं वजन १.३ ते १.६ किलोग्राम एवढं असतं. लिव्हर शरीरातील विषारी घटक पित्ताच्या स्वरूपात फिल्टर करण्याचं काम करतं आणि मल किंवा मूत्र स्वरूपात शरीरातून बाहेर टाकले जातात. लिव्हर शरीरामध्ये जवळपास ३०० पेक्षा अधिक कामं करतं. लिव्हर रक्तामध्ये साखरेचं प्रमाण नियंत्रणात करण्याचं काम करतो. लिव्हरचं एक कार्य शरीरात रक्त तयार करणं हेदेखील आहे.

या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका

- **त्वचेचा रंग पिवळा होणं** : लिव्हरचं काम बिघडतं तेव्हा याचा परिणाम त्वचेवर दिसून येतो. तसेच डोळ्यांमध्येही पिवळेपणा वाढतो. त्वचेचा रंग पिवळा पडणं, लघवीचा रंग पिवळा होणं यांसारखी लक्षणं दिसून आली तर वेळीच सावध व्हा.
- **उलटीमधून रक्त पडणं** : जेव्हा सतत मळमळ होणं किंवा उलट्या येणं यांसारख्या समस्या वाढतात. त्यावेळी लिव्हरची समस्या असण्याती शक्यता असते. तसेच उलटी करताना त्यातून रक्त पडलं तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. तज्ञांचा सल्ला घ्या.
- **हाता पायांना सूज येणं** : लिव्हरचं आरोग्य बिघडतं त्यावेळी पोटाच्या खालच्या बाजूला सूज जाणवू लागते. तसेच हाता-पायांनाही सूज येते. जर तुम्हालाही ही समस्या जाणवत असेल तर दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक असतं.
- **थकवा जाणवणं** : अनेकदा आपल्याला थकवा येत असेल तर हेदेखील लिव्हर खराब होण्याचे संकेत असू शकतात. थकवा येण्याची इतरही कारण असू शकतात. त्यामुळे योग्य कारण ओळखण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- **जेवण बेचव लागत असेल तर** : जेवणाची इच्छा होत नसेल किंवा चव लागत नसेल तर ही गंभीर समस्या असू शकते. तसेच

महिला सुंदर दिसण्यासाठी विविध आपली सुंदरता वाढवण्यासोबतच आपल्या श्रृगांवरही लक्ष देतात ज्यामुळे त्या आकर्षक दिसतात. यापैकी एकच म्हणजे कानातले ज्यामुळे चेहऱ्याची सुंदरता अधिक वाढते. मात्र हे कानातले आपल्या चेहऱ्याला सूट होण्यासारखे घातले तर चांगेल वाटतात नाहीतर ते चेहऱ्याची सुंदरता बिघडवतात. यासाठी जाणून घ्या आपल्या चेहऱ्याच्या अनुसार कोणत्या प्रकारचे कानातले तुम्ही घातले पाहिजेत.

- **चौकोनी चेहरा** : जर तुमचा चेहरा चौकौनी आहे तर अशा चेहऱ्यावर गोल आणि टियर ड्रॉप इअरिंग्स शोभून दिसतात. चौकोनी चेहऱ्यावर मोठे स्टोन्स असलेले इअररिंग्च्या ऐवजी छोटे छोटे स्टोन्स असलेले इअररिंग्ज वापरा.
- **हार्ट आकाराचा चेहरा** : अशा चेहऱ्याच्या व्यक्तींनी नेहमी लांब आण घुमावदार इअररिंग्ज निवडावे. या मुळे चेहऱ्याची सुंदरता अधिक वाढते. अभिनेत्री प्रियंका चोप्राचा चेहरा असा आहे.
- **गोलाकार चेहरा** : गोलाकार चेहरा असलेल्या महिलांनी चेहरा भरलेला दिसेल असे कानातले घालू नये. कमी लांब असलेले ड्रॉप इअररिंग्ज अशा प्रकारच्या चेहऱ्याला सूट करतात. गोल चेहऱ्याच्या महिलांनी गोलाकार डिस्क असलेले कानातले घालू नयेत.
- **डायमंड चेहरा** : डायमंड आकाराच्या चेहऱ्याावर लांब आणि कर्व्हस असलेले कानातले चांगले वाटतात. जास्त स्टोन असलेले आणि हूप इअररिंग्जही या प्रकारच्या चेहऱ्यावर चांगले दिसतात.
- **अंडाकार चेहरा** : अभिनेत्री कतरिना कैफचा चेहरा अंडाकार आकाराचा आहे. या चेहऱ्यावर सगळ्या प्रकारचे इअररिंग्ज चांगले वाटतात. जास्त लांबीचे इअर रिंग्ज या चेहऱ्यावर चांगले वाटत नाहीत.
- **लांब चेहरा** : ज्यांचा चेहरा लांब असतो अशा व्यक्तींना जास्त लांबीचे इअररिंग्ज चांगले वाटत नाहीत. या चेहऱ्याावर छोटे स्टड अथवा ड्रॉप इअर रिंग्ज चांगले वाटतात. यामुळे चेहरा रूंद वाटतो आणि एक वेगळाच



चेहऱ्यानुसार करा इअररिंग्जची निवड या आहेत टिप्स

आजकाल प्रत्येक आई मुलाच्या दूध न पिण्याच्या सवयीमुळे हैराण असते. तिसऱ्या वर्षांपर्यंत आवडीने दूध पिणारी मुले नंतर मात्र दूध पिण्यास टाळाटाळ करू लागतात. जी मुले स्तनपान किंवा बाटलीने आवडीने दूध पितात.



ती नंतर पेल्याने दूध पिण्यास नकार देतात. एकीकडे छोटी मुले आवडीने दूध पितात तर जसंजशी ती मोठी होऊ लागतात ती दूधाचा ग्लास तोंडालाही लावत नाहीत. ज्यामुळे त्यांना पुरेशी पोषक तत्त्वे मिळत नाहीत. परिणामी शरीरात कॅल्शिअम आणि आर्यनची कमतरता निर्माण झाल्यामुळे शारिरीक आणि मानसिक विकास हळू गतीने होऊ लागते.

अनेक मातांना यामुळे मुलांच्या पोषणाबाबत चिंता वाटू लागते. कारण वाढत्या वयात मुलांनी दूध पिणे खूप गरजेचे आहे. पण जर तुमचे मुलंही दूध पिण्यास टाळाटाळ करत असेल तर पुढील उपाय करून पाहा.

१. **फ्लेवर्ड दूध** : अनेकदा मुलांना दूधाची चव आवडत नाही. त्यामुळे ते दूध पिण्यास नकार देतात. अशावेळी तुम्ही दूधामध्ये चॉकलेट किंवा स्ट्रॉबेरी फ्लेवर घालून त्यांना देऊ शकता. मुलं असे फ्लेवर्ड दूध लगेच पितील.

२. **नाश्त्याआधी दूध** : जेव्हा मुलं उपाशी असते तेव्हा त्यांना तुम्ही दूध प्यायला द्या. सकाळी रिकाम्या पोटी असलेली मुलं दूध लगेच पितात. तसेच खेळता खेलता मुलांना दूध प्यायला देण्याचा प्रयत्न करा.

३. **आवडत्या कार्टूनचा ग्लास** : तुमच्या मुलांना जे कार्टून आवडत असेल त्याचा मग किंवा कप आणून त्यात दूध प्यायला द्या. मग पाहा मुलं पटकन दूधाचा ग्लास रिकामा करतील.

४. **मिल्कशेक बनवून द्या** : तुम्ही विविध प्रकारचे मिल्कशेक्स बनवूनही मुलांना प्यायला देऊ शकता. ज्या ऋतूत जी फळे उपलब्ध असतील ती घालून मिल्कशेक बनवा. यामुळे मुलांना दूध आणि फळांचे दोन्ही पोषण मिळेल.

तुमचेही मुलं दूध पित नसतील तर करा हे उपाय

जर वरील उपाय करूनही मुलांनी दूध पिण्यास नकार दिला तर...

- संत्र्याचा रस द्या
- पोळी खाऊ घाला
- त्यांच्या आहारात सोयाबीनचा समावेश करा
- ताज्या फळांचा मिल्कशेक करून द्या.
- भाज्यांचे सूप करून ते द्या
- सॅलड किंवा कोशिंबीरी खाण्याची सवय लावा.
- बदाम आणि चण्यांचा आहारात समावेश करा.

प्रोटीनचे सेवन आपल्यासाठी का आवश्यक आहे आणि त्याचे स्त्रोत शेवटी मुलांनी कितीही नखरे केले तरी आपले कर्तव्य आहे की, त्यांना युक्ती करून दूध देणे. मग तुम्हीही वरील उपाय

गर्भाशयाचा कॅन्सर आता भूतकाळात जाणार? प्रभावी लस सापडल्याचा दावा



कॅन्सर म्हटलं की सगळ्यांच्या काळजाचा ठोका चुकतो. जगभरात एवढं संशोधन झालं मात्र या आजारावर रामबाण उपाय सापडला नाही. आता सगळ्याच शास्त्रज्ञांना आशेचा किरण सापडला आहे. काही प्रगत देशांमध्ये केलेल्या संशोधनात ल्रॅंह्लढंस्त्र'' ह्वें ३१४२ म्हणजेच ल्हढश ही लस गुणकारी ठरल्याचा दावा केला आहे. जगप्रसिद्ध 'लॅन्सेट' या मासिक एक संशोधन अहवाल देण्यात आला आहे त्याचा संदर्भ देत हा दावा केला आहे.

कॅन्सर होण्याचे कारण आणि त्यावर उपाय काय?

- रात्री उशिरा जेवणे करण्याच्या सवयीमुळे पोटाचा कॅन्सर होऊ शकतो.
- जेवणानंतर फळे खाणे टाळावे... जेवायच्या आधी खाल्लेली चालेल.
- मासिकपाळीच्या वेळी चहा पिणे टाळावे.
- अनुशापोटी टमाटे खाऊ नयेत.
- रोज सकाळी उठून एक ग्लास पाणी प्यावे. ब्लॅडर स्टोन होत नाहीत.
- झोपण्यापूर्वी ३ तास आधी जेवावे
- अतिशय गरम पोस्ट खाऊ नयेत.
- झोपताना जवळ मोबाईल ठेवू नये.
- ब्लॅडर कॅन्सर टाळण्यासाठी दिवसातून किमान १० ग्लास पाणी प्यावे.
- दिवसा जास्त तर रात्री कमी पाणी प्यावे.
- इन्सोमॅनिया आणि गॅस प्रॉब्लेम टाळण्यासाठी दिवसातून २ पेक्षा जास्त कॉफी पिऊ नये
- तेलकट कमी खावे. कारण असे जेवण पचण्यासाठी ५ ते ७ तास लागतात. आणि त्यामुळे थकवा येऊ शकतो.
- सायंकाळी ५ नंतर कमी खावे.
- केळी, द्राक्षे, स्पिनीच, भोपळा, पिच अशाप्रकारची सहा फळे खावीत.
- कमी झोप ही आपल्या मेंदूस अपायकारक असते म्हणून किमानपक्षी दिवसात आठ तास तरी झोप घ्यावी.
- सुंदर स्वास्थ्यासाठी दुपारी १ तास वामकुक्षी करावी.
- टमाटे वाफवून शिजवून खावेत. कच्चे टमाटे खाऊ नयेत.
- गरम लिंबूपाण्यामुळे दिघार्युष्य लाभते.
- कॅन्सरच्यापेशी नष्ट होतात.
- रोज गरम लिंबूपाणी प्यावे.
- थंड लिंबूपाण्यात फक्त व्हिटॅमिन सी असते.

कॅन्सर नष्ट करण्याची क्षमता नसते. हे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. गरम लिंबूपाणी हे कॅन्सर वरचा रामबाण उपाय ठरले आहे. कारण ते फक्त कॅन्सरच्यापेशीच नष्ट करते. बाकी पेशींना अपाय पोहचवत नाही. आणि लिंबातील सायट्रिक एसिड, पॉलिफिनॉल उच्च रक्तदाब कमी करते. मुख्य रक्तवाहिन्यातील रक्तप्रवाह सुरळीतपणे चालतो. आणि रक्ताच्या गुठळ्या कमी करतो. दरम्यान, श्रीमंत देशांमध्ये गर्भाशयाच्या कॅन्सरचं प्रमाण कमी असते. कारण निदान झाल्यावर लगेच त्यावर अत्याधुनिक उपचाराच्या सोई तिथे उपलब्ध असतात. मात्र ही सोय गरीब आणि विकसनशील देशांमध्ये उपलब्ध नसते. त्यामुळे अशा देशांमध्ये ही लस अतिशय प्रभावी ठरू शकते असा दावा या संशोधनात करण्यात आल आहे. गरीब देशांमध्ये दरवर्षी ३ लाख महिलांचा गर्भाशयाच्या कॅन्सरमुळे मृत्यू होते. ही लस दिल्यास त्याचे प्रमाण लक्षणीय कमी होऊ शकते असा या शास्त्रज्ञांचा दावा आहे.

उच्च रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी या पाच अन्नपदार्थांचं करा सेवन



धकाधकीच्या आयुष्यात हल्ली बाहुताांश जणांना उच्च रक्तदाबाचा त्रास सहन करावा लागत आहे. उच्च रक्तदाबाचा त्रास उद्भवण्याची कारणे वेगवेगळी असतात. कामाचा ताण, बदलती जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या वाईट सवयी यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास निर्माण होऊ शकतो. योग्य वेळीच उच्च रक्तदाब आजारावर औषधोपचार न केल्यास हृदय रोगांना आयते निमंत्रण मिळते. या समस्येवर उपाय करताना आहारामध्ये बदल केल्यास तुम्हाला योग्य मदत होईल. आहारातील काही घटक कमी-जास्त केल्यास उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवणं शक्य आहे.

१. आहारामध्ये हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करावा. हिरव्या पालेभाज्या शरीरातील अतिरिक्त सोडिअमपासून आपल्याला मुक्तता मिळवून देण्याचं काम करतात. पालेभाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात पोषकतत्त्वांचा समावेश असतो. ज्यामुळे तुमच्या संपूर्ण शरीराला आरोग्यदायी फायदे मिळतात. उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी आपल्या आहारात पालक, कोबी, कारले या भाज्यांचा समावेश करावा.

२. दिवसाची सुरुवात तुम्ही ओट्स खाऊन करत असाल तर हा पर्याय तुमच्या आरोग्यासाठी सर्वाधिक चांगला आहे. ओट्स शरीरासाठी अतिशय पोषक असे आहेत. ओट्समध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते. तर फॅट्स कमी प्रमाणात असतात. ही पोषकतत्त्वे आरोग्य आणि ब्लड प्रेशर दोन्हींचा त्रास कमी करण्यासाठी लाभदायक आहेत. ओट्सच्या सेवनामुळे वजन देखील कमी होण्यास मदत होते. शिवाय, ओट्समध्ये सोडिअमची मात्रा देखील कमी असते, यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास कमी होतो.

३. कीवी फळ आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. दिवसभरात तीन कीवी खाल्ल्यास हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात राहण्यास तुम्हाला चांगली मदत मिळेल. एवढंच नाही तर कीवी त्वचेसाठी देखील उत्तम फळ आहे. या फळामुळे शरीराची पचन प्रक्रिया आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील सुधारते.

४. स्वयंपाकातील मसाल्यांचाही आहारात वापर करून तुम्ही उच्च रक्तदाबाचा त्रास नियंत्रणात आणू शकता. यापैकीच एक पर्याय म्हणजे लसूण. हाय ब्लड प्रेशरचा त्रास लसूणच्या सेवनामुळे कमी होतो. सकाळच्या सुमारास पाण्यासोबत कच्चं लसूण खावे. उच्च रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी तुम्ही विविध अन्नपदार्थांमध्येही लसूणचा समावेश करावा.

५. दह्याच्या सेवनामुळे हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात आणण्यास मदत होऊ शकते. हा त्रास कमी करण्यासाठी आहारामध्ये दह्याचा समावेश करावा. यामध्ये कॅल्शिअमचं प्रमाण अधिक असते आणि दही रक्तदाबाची पातळी

कॅन्सरच्या दुष्परिणामांचा महिलांना अधिक असतो धोका



पोटाचा कॅन्सर इतर कॅन्सरप्रमाणेच जीवघेणा असतो. पुरूष असो वा महिला सर्वांसाठीच कॅन्सर हा घातक ठरू शकतो. मात्र अशात एका रिसर्चमधून दावा करण्यात आला आहे की, ज्या महिलांना अन्न नलिकेचा किंवा पोटाचा कॅन्सर असतो त्या महिला पुरूषांच्या तुलनेत अधिक काळ जगतात. सोबतच त्यांना किमोथेरपी दरम्यान उलटी, मळमळ व डायरियाचा सुद्धा त्रास होतो. या रिसर्चमुळे पोटाच्या कॅन्सरने पीडित रूग्णांचं चांगल्याप्रकारे परीक्षण करण्याचा फायदा मिळेल. सोबतच या रिसर्चच्या परिणामांच्या आधारावर आता सहजपणे हे समजून घेता येईल की, लोकांमध्ये कॅन्सरच्या दुष्परिणामांचा अधिक धोका असतो. पोटाच्या खालच्या भागात खूपसाऱ्या पेशी असतात आणि जेव्हा या कोणत्याही अडचणीशिवाय वाढू लागतात तेव्हा कॅन्सरचं रूप घेतात. ब्रिटनच्या रॉयल मार्सडेन हॉस्पिटलच्या अवनी अथोदा 'या रिसर्चच्या मुख्य लेखिका आहेत. त्या म्हणाल्या की, 'आपण अन्न नलिका आणि पोटाच्या कॅन्सरच्या उपचारासाठी स्ट्रॅंडर्ड ट्रीटमेंटचा वापर केला जातो. पण या रिसर्चमधून महिला आणि पुरूष रूग्णांमध्ये दोन वेगवेगळे फरक बघायला मिळतात. एकतर हा की, किमोथेरपीदरम्यान कोणत्या प्रकारची प्रतिक्रिया देतात आणि दुसरा हा की, कॅन्सरच्या उपचारानंतर ते किती काळ जगतात. त्यामुळे महिलांच्या संदर्भात उपचारादरम्यान पोट आणि अन्न नलिकेच्या कॅन्सरच्या थेरपीने होणारे साइड इफेक्ट्सबाबत त्यांना जागरूक करणे आणि सल्ला देणे महत्त्वाचं ठरू शकतं'. या रिसर्चसाठी वैज्ञानिकांनी मुख्य रूपाने यूकेमध्ये आधीच प्रकाशित चार रॅंडम पद्धतीने केल्या गेल्या परिक्षणांमधून आकडेवारी घेतली आणि त्यांचं विश्लेषण केलं. हा रिसर्च त्यांनी ३ हजार रूग्णांवर केला. ज्यातील २, ६६८ रूग्ण पुरूष होते तर ५९७ महिला होत्या. वैज्ञानिकांना यातून आढळलं की, पुरूष रूग्णांच्या तुलनेत महिला रूग्णांना उलटी, मळमळ आणि डायरियासारख्या समस्यांचा अनुभव येतो. सोबतच हा निष्कर्ष काढण्यात आला की, महिला रूग्ण पुरूष रूग्णांच्या तुलनेत अधिक काळ जगतात.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई


मुंबई, मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६

संपादकीय

ध्वनिप्रदूषणाला धर्माचा रंग कशाला?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथे मशिदींवरील भोंग्यांचा आवाज कमी करण्यावरून सुरू झालेले राजकारण, धार्मिक अस्मिता आपल्या पुढच्या पिढ्यांवर घातक परिणाम करणारे आहे एवढे तरी आपण लक्षात घ्यावे.भारतात १९२९ साली आलेला ध्वनिवर्धक उर्फ लाऊडस्पीकर उर्फ भोंगा, प्रारंभी सभा, संमेलनांमध्ये आला. मग, विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, मनोरंजनात्मक कार्यक्रमांत, मिरवणुकांमध्ये त्याचा शिरकाव झाला. १९३० च्या दशकात मशिदींच्या मिनारांवर चारी दिशांना तोंडे करून भोंगा आरूढ झाल्यावर मंदिरे तरी मागे का राहतील? तिथेही भोंगे आले, त्यावर भजने-कीर्तने आली. मशिदींमधून दररोज पाच वेळा, न चुकता, अजान आजही होते. खरे तर मशिदींवर पहिल्यांदा भोंगे लागले तेव्हा काही मुल्ला-मौलवींनी त्यास विरोध केला होता आणि 'शैतान की आवाज' म्हणून संभावना केली होती असे म्हणतात. परंतु हळूहळू त्यास मान्यता मिळत गेली आणि नंतर अगदी खेड्यापाड्यातल्या लहान मशिदींपासून ते शहरी, ऐतिहासिक मशिदींपर्यंत भोंगे पोहोचले.

मशिदीतील अजान असो की मंदिरातले भजन-कीर्तन, यामुळे ध्वनिप्रदूषण होते. म्हणून सुजाण भारतीय अशा भोंग्यांना विरोध करीत असतात. धार्मिक संघटना याबाबतीत संविधानातल्या धार्मिक स्वातंत्र्य देणाऱ्या कलम २५ चा आधार घेऊन भोंग्यांचे समर्थन करतात. परंतु या कलमानुसार प्रत्येक व्यक्तीला कोणताही धर्म पाळण्याचे, आचरण करण्याचे आणि प्रचार करण्याचे स्वातंत्र्य असले तरी ते सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्याच्या अधीन आहे. म्हणजेच हे स्वातंत्र्य अमर्याद नाही. ध्वनिप्रदूषण हे आरोग्यास अपायकारक असल्याचे विज्ञानाने सिद्ध झालेले असल्यामुळे या कलमाने घातलेल्या आरोग्यविषयक मर्यादेचा ते भंग करते. त्यामुळे त्यावर नियंत्रण घालणे योग्यच ठरते.

या विरुद्ध, विशेषतः मशिदीवरील भोंग्यांच्या रूपाने होणाऱ्या प्रदूषणाविरुद्ध, १९९० च्या दशकात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आवाज उठवला. राजकरणात धर्माचा चंचूप्रवेश झाल्यापासून मशिदींवरील भोंगे हा कायम एक वादाचा विषय राहिला आहे. त्याच वेळेस मंदिरांवरील भोंग्यांना मात्र अगदी तुरळक विरोध होताना दिसतो. भोंग्याला धर्म चिकटल्यावर मग आवाजाची स्पर्धाच सुरू झाली आणि आजच्या काळात या स्पर्धेने विकृत स्वरूप घेतलेले आपण पाहात आहोत. राजकारणावर धार्मिकता वरचढ ठरू लागल्यावर ध्वनिप्रदूषण हा मुद्दा सापेक्ष बनला, खरे तर मागे पडला. 'त्यांच्या' भोंग्यांमुळे होणारे प्रदूषण आणि 'आपल्या' भोंग्यांमुळे होणारे प्रदूषण याची पक्षपाती तुलना सुरू झाली. 'त्यांचे' भोंगे सावत्र, म्हणून नावडते ठरू लागले.

हे होत असताना न्यायालयांत देखील यावर प्रकरणे येत राहिली. २००० साली सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक स्वातंत्र्याचा भाग म्हणून ध्वनिक्षेपक वापरण्यास संविधानाच्या कलम २५ अनुसार 'अत्यावश्यक धार्मिक परंपरा' म्हणून संरक्षण लाभू शकत नाही, असे प्रतिपादन केले होते. २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी घातली. २०२० साली अलाहाबाद उच्च न्यायालयाने अजान हा इस्लामचा अत्यावश्यक भाग असल्याचे मान्य केले. परंतु ध्वनिक्षेपक मात्र नाही, असे सांगितले. कर्नाटकात २०२१ साली धार्मिक स्थळांवरील सर्व बेकायदेशीर ध्वनिक्षेपकांवर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. गेल्या वर्षी न्यायालयाच्या आदेशावरून मशिदींवरचे शेकडो भोंगे काढले गेले आहेत. हे पाहून प्रश्न पडतो की आपल्या देशाला अनेक समस्या भेडसावत असताना आपले राजकारण, धर्मकारण, हे भोंग्यांतच का अडकून पडले आहे?

निवडणूक प्रचारादरम्यान उजव्या संघटना, आपण सत्तेवर आल्यास मशिदींवरील भोंग्यांवर बंदी घालू अशी आश्वासने देत असत. त्यांची सत्ता आल्यावर देखील प्रार्थनास्थळांवरील भोंगे बेकायदेशीर ठरवणारा एखादा कडक कायदा मात्र आजतागायत त्यांनी आणलेला नाही. उलट मशिदींवरील भोंग्यांना उत्तर म्हणून आता जवळपास प्रत्येक मंदिरावर भोंगे लावले गेले आहेत. अनेक लहान शहरांमध्ये आणि खेड्यांमध्ये पहाटे पाच वाजल्यापासून दोन-तीन तास भोंग्यांवरून भजने-कीर्तने यांचा रतीब घातला जातो आहे. एखाद्या गावात चार-पाच वेगळी मंदिरे असल्यास सर्वच मंदिरांवरील भोंगे एकाच वेळेस सुरू असतात आणि प्रचंड गोंगाट असतो. बरे, या विरुद्ध बोलूही शकत नाही. कारण लगेच बोलणारा धर्मविरोधी ठरतो आणि 'त्यांचे' भोंगे ऐकू येत नाहीत का, या प्रश्नाचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे त्या गावाच्या दहा-बारा किलोमीटरच्या परिसरात एकही मशीद नसते. जसजशी ध्वनिवर्धकामध्ये वैज्ञानिक प्रगती होत गेली तसतसे त्याचे स्वरूपही बदलत जाऊन, स्टीरिओ, डॉल्बी, डीजे असे एकापेक्षा एक भयावह प्रकार जन्माला आले आहेत. त्यांचा आवाज एवढा मोठा असतो की डेसिबलमध्ये हे प्रमाण १००पेक्षा अधिक असते. याची कायदेशीर मर्यादा जास्तीत जास्त ७० डेसिबल असते. ८५ डेसिबलपेक्षा अधिक आवाज बहिरेपणास कारण ठरू शकतो. याच्या आवाजाने खिडक्या, दरवाजे आणि भिंती हादरतात. जवळ उभे असलेल्या लोकांच्या छातीवर प्रहार झाल्यासारखे वाटते. काही ठिकाणी या अति ध्वनीने काही युवकांचा मृत्यू झाल्याचे प्रकार देखील घडले आहेत. रुग्ण, वयोवृद्ध व्यक्ती आणि बालके यांच्यासाठी तर हे खूपच घातक असते. गणेशोत्सवादरम्यान निघणाऱ्या आगमन-विसर्जन मिरवणुका, नवरात्री उत्सव, काही महापुरुषांच्या जयंत्या, लग्नसोहळे यांत डॉल्बी-डीजेचा उच्छाद धार्मिकतेच्या नावाने सुरू असतो. या दिवसांत सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिवर्धकावर घातलेल्या वेळेच्या बंधनाचे सर्रास उल्लंघन कधी सरकारच्या आशीवार्दाने तर कधी कायदे, नियम धाब्यावर बसवून केले जाते. समाजाला अति आवाजाचे एवढे व्यसन जडले आहे की डीजे वाजवायची वेळ संपून गेल्यावर नाशिक ढोल-ताशांचे भीषण तांडव सुरू होते. कारण कायद्याने ढोल-ताशा ध्वनिवर्धक नाहीत! यावरून हे दिसून येते की मशिदींवरील भोंग्यांना विरोध ध्वनिप्रदूषणामुळे नव्हे, तर धार्मिक आकसातून असतो.

या प्रश्नावर दृष्टिक्षेप टाकण्याचे कारण आहे उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथे सुरू झालेले आणि सोशल मीडियात गाजत असलेले भोंगा युद्ध. तिथल्या मशिदींवरील भोंग्यांचा आवाज कमी करावा असे लोकांनी सांगून सुद्धा तो कमी केला नाही. म्हणून तिथल्या हिंदूंनी ५० फुटी मनोरा उभारून त्यावर १३ स्पीकर्स बसवून मोठ्या आवाजात हनुमान चालीसाचे पठन सुरू केले. पोलीस, न्यायालये यांची मदत घेऊन मशिदीवरचा आवाज कमी करण्याऐवजी त्यांच्यापेक्षा मोठा आवाज काढून ध्वनिप्रदूषण रोखले गेले काय? या मोठ्या आवाजाचा त्रास आपल्याच धर्मबांधवांना होत नसेल काय? परंतु झालेल्या प्रकारावरून ध्वनिप्रदूषण हा मुद्दा नसून केवळ 'त्यांचा' भोंगा हा मुद्दा कायम तप्त राहावा हाच अजेंडा यामागे आहे, असा संशय येतो. म्हणूनच सर्वच धर्मांच्या प्रार्थनास्थळावरील भोंगे काढून टाकण्याचा कायदा अस्तित्वात आणला जात नसावा. कारण, मशिदीवर भोंगे आहेत म्हणून त्याविरुद्ध वातावरण तापवता येते, मंदिरांवर भोंगे लावता येतात. सर्वच भोंगे काढले तर हा प्रश्नच संपेल. न रहेगा बांस न बजेगी बांसुरी... असो, केवळ आपल्या खऱ्या-खोट्या धार्मिक अस्मिता जपण्यासाठी आपल्या पुढच्या पिढ्यांवर आपणच घातक परिणाम लादत आहोत एवढे तरी लक्षात घ्यावे.

आणखी एक बस अपघात



गेल्या आठवड्यातच बेस्ट उपक्रमात खासगीकरण का नको यावर प्रकाश टाकत असतानाच दुदैर्वाने भांडुप बेस्टचा अपघात घडला. कुर्ला येथे झालेल्या अपघाताची आठवण झाली. योगायोगाने वर्ष संपता संपता झालेला हा अपघात आणि गेल्या वर्षी याच कालावधीत झालेला कुल्यार्तील तो अपघात दोन्हीही बस एकाच कंपनीच्या, म्हणून यावर आता पुन्हा ऊहापोह करणे आवश्यक आहे.

वर्ष संपता संपता भांडुप येथे झालेला अपघात हा दुदैर्वीच. गेल्यावर्षी कुर्ला येथे झालेला अपघातही वर्ष संपता संपता झाला. दोघांमध्ये ओलेक्ट्रा या खाजगी बस गाडीचा अपघात सारखा नसला तरी गेल्या सोमवारची बस मिडी होती तर कुर्ला येथे झालेल्या अपघातातली बस ही बारा मीटर मोठी होती. भांडुप येथे पादचाऱ्यांना बसने चिरडले व कुर्ला येथील बस अपघातातही पादचाऱ्यांनाच बसने चिरडले. दोन्ही अपघातांतील अहवालामध्ये बस चालकालाच जबाबदार ठरवले गेले आणि पुन्हा सर्वजण मोकळे झाले. वास्तविक या बसगाड्यांच्या त्रुटीकडे आजतागायत कोणालाही लक्ष द्यायला वेळ नाही. सर्वचजण निवडणुकीच्या धामधुमीत व्यस्त आहेत. मृतांच्या नातेवाइकांना आर्थिक मदत करून सर्वजण मोकळे झाले, मात्र बसबाबत निर्माण झालेले प्रश्न हे जशेच्या तसे राहिलेत. या अपघाताबद्दल बरेच प्रश्न निर्माण झाले. वास्तविक बस खासगी कंत्राटदाराची होती. मग यावर बेस्टचा चालक कसा? जेव्हा या कंपनीबरोबर करार झाला तेव्हा त्यांनी चालक दल पुरवणे आवश्यक होते. मात्र कंत्राटदारांकडील बस चालक टिकत नाहीत आणि मग नाईलाजाने बेस्टचे चालक वापरावे लागतात. थोडेफार चालक प्रशिक्षण देऊन त्यांना विद्युत बस गाड्यांवर पाठवण्यात येते. मागील वर्षी कुर्ला येथील जो अपघात घडला त्यातील बस चालकाला काही थोड्या दिवसांचे जुजबी प्रशिक्षण देऊन या विद्युत बसगाडीवर पाठवण्यात आले होते. बस गाडीचा अहवाल काय आला हे सारे गुलदस्त्यातच राहिले. मात्र त्या कंपनीला वाचवण्यासाठी अखेर संपूर्ण यंत्रणेलाच बस चालकाचा बळी द्यावा लागला. दहा ते वीस हजार करोड असलेली ही कंत्राटे टिकवण्यासाठी कोणाचा तरी बळी द्यावाच लागणार.

भांडुप बस अपघातातील बस चालकावर सध्या यंत्रणेनेच घाव घातला आहे. यंत्रणा कशा पद्धतीने काम करते आहे याचे हे उत्तम उदाहरण. वास्तविक पाहता ही बस गेले काही दिवस दुरुस्ती कामामुळे उभी होती. जेव्हा ती रस्त्यावर आली तेव्हा त्याबाबत वारंवार तक्रारी केल्या गेल्या होत्या. तरी मात्र त्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि अखेर अपघात हा घडलाच. सुरक्षित आरामदायी प्रवास म्हणून या बसेना प्रवासी प्राधान्य देतात. आशिया खंडातील सर्वात दजेर्दार सेवा देणारी म्हणून बेस्ट उपक्रमाची जगभरात ओळख आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून तोट्याच्या नावाने बेस्ट उपक्रमात कंत्राटी पद्धतीने बेस्ट उपक्रमाला पूर्णपणे वेढले आहे. कंत्राटी पद्धतीवर बसेनंतर कंत्राटी चालक व वाहक यामुळे बेस्ट उपक्रमाची खासगीकरणाकडे वाटचाल सुरु आहे. मात्र हे खासगीकरण नसल्याचे बेस्ट उपक्रमाने स्पष्ट केले असले तरी प्रत्यक्षात कंत्राटी पद्धतीवर बेस्ट उपक्रमाचा अंकुश नाही, हे वारंवार सिद्ध होत आहे. आज संपूर्ण कारभार कंत्राटी पद्धतीवर अवलंबून आहे. कंत्राटी पद्धत बेस्ट उपक्रमासाठी तापदायक ठरु लागली असून बेस्टचे कायमस्वरूपी कर्मचारी यात नाहक बदनाम होत आहेत. मुळात खासगीकरणामागे बेस्ट इतकी वाहवत गेली, की त्याच्या मूळ उद्दिष्टापासूनच भरकटत चालली आहे. काही महिन्यांपूर्वी बेस्टकडे ५०० हून जास्त मिडी बस गाड्या होत्या. मात्र त्या कालांतराने भंगारात गेल्या. मुंबईच्या उपनगरातील काही पूर्व व पश्चिम उपनगरातील काही ठिकाणी अशी आहेत, की तिथे छोटे व अरुंद गल्लीबोळातील रस्ते आहे. तेथे बेस्ट सेवा सुरू होत्या. मात्र कालांतराने त्यात घट होऊ लागली. जेथे बस सेवा सुरू होत्या, तिथे चालवण्यासाठी बेस्टकडे त्या प्रकारच्या बस गाड्या नाही, म्हणून खासगी कंत्राटदारांकडे बस गाड्या चालवण्याचा प्रयत्न केल्यास मात्र तोही निष्फळ ठरला आणि अखेर बऱ्याच ठिकाणी या बस सेवा बंद कराव्या लागल्या.

कांजूर, भांडुपमधील जेथे अपघात झाला तेथे नरदास नगर, टेंभीपाडा, प्रताप नगर तसेच डोंगराळ भागात छोट्या गल्ल्या असल्याने तेथे मिडी प्रकारच्या बस गाड्या बेस्टने काही काळापूर्वी बनवून घेतल्या होत्या. मात्र नंतर बेस्टने बस खरेदी करणे बंद केले. जास्त बोंबाबोंब झाल्याने लोकप्रतिनिधींनी बेस्टवर दबाव टाकण्यास सुरुवात केली व काळा किल्ला आगारातून मिनी बस गाड्या या विक्रोळी आगारात आणून भांडुप, कांजूरमार्ग परिसरात चालवण्यात येऊ लागल्या. बऱ्याच बस चालकांनी तेथे बस चालवण्यास नकार दिला. काही ठरावीक बस गाड्या धावत होत्या. मात्र या अत्याधुनिक खासगी बस गाड्या या पटकन वेग घेतात. त्यामुळे उतारावरही या बस गाड्यांवर ताबा राहत नाही. अशा बऱ्याच तक्रारी होत्या. तरी बेस्टने त्या चालू ठेवल्या आणि भांडुप येथे ही दुदैर्वी घटना घडली. अशा बऱ्याच तांत्रिक व इतर समस्या या लोकप्रतिनिधी तसेच कामगार संघटना यांनी बेस्ट उपक्रमाच्या निदर्शनास यापूर्वी आणून दिल्या होत्या. मात्र या सर्व तक्रारांकडे बेस्ट उपक्रमाने दुर्लक्ष केले आणि त्याची परिणिती अपघातात झाली. कुर्ला व भांडुप येथे झालेला अपघात अरुंद रस्त्यांमुळे झाला. पदपथावर असलेल्या अतिक्रमणांमुळे झाला. भांडुप व कुल्यार्चा अपघातही अशाच कारणांमुळे झाला. आता यावर उपाय म्हणून बेस्ट व्यवस्थापक यांनी सर्व बेस्ट चालकांना विद्युत बस गाड्यांचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य केले आहे. बेस्ट बस चालकांच्या प्रशिक्षणाचा प्रश्न त्यामुळे कंत्राटदाराचा आहे त्यासाठी बेस्टच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांनी विद्युत बस गाडीचे प्रशिक्षण का घ्यावे? बेस्टकडे स्वमालकीच्या फक्त सहा विद्युत बस गाड्या आहेत व आगामी काळात स्वमालकीच्या बस गाड्या घेणे बेस्टला परवडण्यासारखे नाही. मग कंत्राटदारांच्या बस गाड्यांवर प्रशिक्षण घेऊन पुन्हा अपघात घडल्यास बेस्ट बस चालकाला पुन्हा जबाबदार ठरवणार? अशा व्यवस्थेचा बळी बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ठरवले जाणार का? का आता तरी यात सुधारणा होणार, याचे उत्तर येणारा काळ देईल? हे पाहणे औत्सुक्याचे असेल.

धर्म योग्यरित्या शिकवणे आवश्यक!



आज भारतीय समाज एका विचित्र संक्रमण काळातून जात आहे. एका बाजूला विज्ञान, तंत्रज्ञान, इंटरनेट, कृत्रिम बुद्धीमत्ता, जागतिकीकरण आणि डिजिटल क्रांती यांमुळे अनेक प्रकारच्या संधींची दारे उघडली आहेत, तर दुर्सया बाजूला माणसाच्या आतल्या जगात एक शांत; पण खोल संकट घोंगावत आहे. हे संकट आर्थिक किंवा राजकीय नाही, तर स्वतःच्या ओळखीचे, जीवनाच्या मूळ अर्थाचे आणि मानसिक स्थैर्याचे आहे. विशेषतः मुले आणि किशोरवयीन पिढी या संकटाच्या केंद्रस्थानी आहे. घटना आहे उत्तरप्रदेशातील गाझियाबाद येथे ३ सख्ख्या बहिणींनी दक्षिण कोरियन संस्कृतीच्या आहारी जाऊन आत्महत्या केल्याची! या मुली कोरियन संस्कृतीच्या इतक्या आहारी गेल्या होत्या की, त्यांनी स्वतःची कोरियन नावे ठेवली होती आणि त्यांना भारतापेक्षा कोरियन संस्कृती, रहाणीमान आवडू लागले होते. वयाच्या ९ व्या वर्षी 'अहं ब्रह्मास्मि' हे ज्ञान संपूर्ण जगाला देणारे आद्य शंकराचार्य ज्या भूमीत अवतरले, तेथील समाजालाही या समस्येला सामोरे जावे लागते, याहून दुर्दैवी अन्य काही असू शकत नाही. गाझियाबादमधील घटना ही केवळ एक वेगळी दुर्घटना नसून आपल्या भारतीय समाजात खोलवर रुजत चाललेल्या डिजिटल समस्येचे एक भयावह प्रतिबिंब आहे. भारतीय मनोरंजनाची दिशा गेल्या काही वर्षांत वेगाने पालटली आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आदी पाश्चात्त्य देशांसह भारतात दक्षिण कोरिया देशातील संस्कृती मोठ्या प्रमाणात वाढीस लागली आहे. कोरियन चित्रपट, लघुपट, कथा, खेळ, नृत्य, संगीत, कोरियन सौंदर्य परिमाणे, भोजन यांची भारतियांना भुरळ पडली आहे. प्रौढ भारतीय कोरियन सौंदर्य परिमाण असलेल्या 'ग्लास स्कीन'वर ('काचेप्रमाणे दिसणाऱ्या त्वचे'वर) स्वतःला पडताळत आहेत, तर दुसरीकडे किशोरवयीन कोरियन मनोरंजनात रममाण होत आहेत. गेल्या काही वर्षांत भारतातील जवळजवळ प्रत्येक प्रमुख शहरात कोरियन खाद्यपदार्थांची विक्री करणारी उपाहारगृहे उपलब्ध असल्याने कोरियन खाद्यपदार्थांच्या विक्रीने उच्चांक गाठला आहे. इंटरनेटच्या सहज उपलब्धतेमुळे या कोरियन पद्धतींविषयीचा अतीआकर्षण मुलांमध्ये निर्माण होत आहे. त्याचाच परिणाम म्हणजे गाझियाबादची घटना आहे. आजच्या मुलांचे आयुष्य बाहेरून पाहिले, तर सुविधा, साधने आणि मनोरंजनाने भरलेले दिसते. हातात स्मार्टफोन, घरात इंटरनेट, जगभरातील माहिती एका 'क्लिक'वर उपलब्ध आहे; पण या सगळ्या बाह्य गडबडीत मुलांच्या आत एक पोकळी वाढत चालली आहे. ही पोकळी केवळ वेळेची नाही, तर अर्थाची आहे. 'मी कोण आहे?, माझे आयुष्य कशासाठी आहे?, मी दुःखी आहे, याचा अर्थ काय?, अपयश, मृत्यू, एकाकीपणा यांना कसे सामोरे जायचे?' या मूलभूत प्रश्नांची उत्तरे आज अनेक मुलांना मिळत नाहीत. जेव्हा ही उत्तरे स्वतःचे, शाळा किंवा ज्या समाजात आपण वावरतो, तेथून मिळत नाहीत, तेव्हा मुले ती उत्तरे इंटरनेट, ऑनलाईन गेम्स, आभासी जग आणि परकीय संस्कृतीत शोधू लागतात. साम्यवादी वाळवीने हिंदु धर्माचरणाच्या मुळावरच घाव घातल्याने मूळ हिंदु तत्त्वज्ञान आजच्या डिजिटल युगातही लोकांपर्यंत म्हणावे तेवढे पोचलेले नाही. हीच दरी परकीय पद्धतीने सहज भरली आहे. 'डिजिटल माध्यमे वाईट कि चांगली?' हा येथे विषय नसून त्याचा वापर कसा होतो, कोणत्या मानसिक स्थितीत होतो आणि त्यामागे कोणती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे, याचा आहे. आज अनेक मुले ऑनलाईन गेम्समध्ये 'मिशन', 'टास्क', 'लेव्हल', 'कमांडर' अशा संकल्पनांमध्ये गुंततात; कारण तिथे त्यांना लक्ष्य आणि ओळख मिळते. प्रत्यक्ष आयुष्यात जे मिळत नाही, ते आभासी आयुष्यात मिळू लागते. हळूहळू खरे जग कंटाळवाणे, कठीण आणि अर्थहीन वाटू लागते, तर आभासी जग अर्थपूर्ण, आकर्षक आणि नियंत्रणात असल्याचा भास निर्माण करते. याच ठिकाणी भारतीय संस्कृती आणि हिंदु धर्माच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते. हिंदु धर्म म्हणजे केवळ पूजा, कर्मकांड किंवा परंपरा एवढेच नाही. तो एक अत्यंत खोल, व्यापक आणि जीवनाशी थेट संवाद साधणारी दर्शनप्रणाली आहे. हिंदु तत्त्वज्ञान माणसाला लहानपणापासून हे शिकवतो की, आयुष्य म्हणजे केवळ सुखांचा संग्रह नाही, तर सुख-दुःख, यश-अपयश, जन्म-मृत्यू यांचा नैसर्गिक प्रवास आहे. दुःख आले म्हणजे 'आयुष्य संपले', असे नाही, तर दुःखही शिकवण देते, परिपक्व करते, अंतर्मुख करते, अशी दृष्टी हिंदु संस्कृती देते. आज अनेक मुले मृत्यूकडे नाट्यमय दृष्टीकोनातून पहातांना दिसतात. काही वेळा मृत्यूला 'एस्केप' (पलायन), 'फायनल सोल्यूशन' (शेवटचा पर्याय) किंवा 'अल्टीमेट स्टेटमेंट' (अंतिम विधान) म्हणून पाहिले जाते. यामागे समाजात विशेषतः तरुणांमध्ये मृत्यूविषयी रुजलेली चुकीची संकल्पना कारणीभूत आहे. हिंदु धर्म मात्र मृत्यूला नकारात्मक किंवा भयावह शेवट मानत नाही. 'मृत्यू हा जीवनचक्राचा एक भाग आहे, आत्मा अमर आहे, कर्माचे फळ भोगावे लागते, जीवनाचा प्रत्येक क्षण मौल्यवान आहे', अशा संकल्पना मुलांना लहानपणापासून समजल्या, तर मृत्यूकडे पहाण्याची दृष्टीच पालटते. आज मानसिक आरोग्याबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होते; पण ती केवळ औषधे, उपचार यांत अडकते. हिंदु धर्म आणि भारतीय संस्कृती मात्र मानसिक आरोग्याला जीवनशैलीचा भाग मानते. ध्यान, प्राणायाम, योग, जप, सेवा, स्वाध्याय, मौन, निसर्गाचे सान्निध्य या गोष्टी आता आधुनिक मानसशास्त्रानेही 'तणाव व्यवस्थापन, भावनांचे नियमन आणि चिंतामुक्तता या अर्थाने मांडायला आरंभ केला आहे'; पण या गोष्टी आपल्या संस्कृतीत सहस्रो वर्षांपासून होत्या, ज्या जीवनाच्या आवश्यकतेपोटी विकसित झाल्या. आज अनेक जण याला एकतर अंधश्रद्धा, मागासलेपणाचे प्रतीक मानतात, तर काही जण धर्माला नियम, भीती, शिक्षा आणि बळजोरी समजतात. या दोन्ही समजुतीत मुलांची हानी होते. धर्म जर संवादाविना, प्रश्नांची जागा न देता, केवळ 'करायलाच हवा'; म्हणून दिला गेला, तर मुले त्यापासून पळतात आणि धर्म जर पूर्णपणे शिकवलाच नाही, तर मुले बाहेर कुठेतरी अर्थ शोधायला लागतात. त्यामुळेच योग्य पद्धतीने धर्म शिकवणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृती आणि हिंदु धर्माचे शिक्षण म्हणजे जगाचा सामना करण्यासाठी आतून बळकट करणे. धर्मातील कर्मसिद्धांत समजून घेतले, तर अपयश आले, तरी पूर्णपणे कोलमडत नाही. रामायण-महाभारत केवळ कथा म्हणून नाही, तर मानवी स्वभाव, द्वंद्व, चुका आणि निर्णय यांची उदाहरणे म्हणून पाहिले, तर आयुष्यातील गुंतागुंतीकडे अधिक समजूतदारपणे पहाता येतात.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६

मराठवाड्यात कॉप्यांचा सुळसुळाट

मराठवाड्यातील काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कॉपी प्रकरणे पुढे आली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही कॉप्यांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर (ता. कन्नड) येथे इयत्ता 12 वीच्या इंग्रजी पेपरदरम्यान मोठा गैरप्रकार उघडकीस आला. परीक्षा केंद्रावरील उठळश फुटेज आणि उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे तब्बल 19 पर्यवेक्षक आणि केंद्रसंचालकांवर कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. येथील दक्षता समितीचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि विभागीय बोडार्चे अध्यक्ष अनिल साबळे यांच्या आदेशानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाने संपूर्ण तपास पूर्ण केला.


बारवीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट

शिक्षणमंत्री संतापले, म्हणाले, केंद्र प्रमुख अन पर्यवेक्षकांवर कारवाई

मुंबई। राज्यात १२ वी बोर्ड परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून राज्य सरकारच्या कॉपीमुक्त अभियानास पहिल्याच दिवशी हरताळ फासण्यात आल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे, परीक्षा केंद्रावरील अधिकारी आणि पयंवेक्षक विद्यार्थ्यांना कॉपी पुरवत असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले असून पालकांकडून संताप व्यक्त होत आहे.

याप्रकरणी, जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे निर्देश दिले असताना आता, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही संबंधित केंद्रांची मान्यता रद्द करण्यात येईल, तसेच पर्यवेक्षक आणि केंद्र अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

परीक्षा केंद्रातील शाळांना सीसीटीव्ही लावणे इतर सुविधा, पाणी, बसेस वेळेवर पोहचल्या पाहिजे यांसह सर्वच निर्देश दिले होते. तरीही १२ वी परीक्षांत कॉपीच्या घटना घडल्याचं दिसलं. त्यामुळे, कॉपीच्या घटना समोर आलेल्या केंद्रावर रद्द बातलची कारवाई केली जाईल, यापुढे परवानगी दिली जाणार नाही. कॉपी करणाऱ्यांसह केंद्र प्रमुख आणि पालकांवरही कारवाई केली जाईल. ज्या शाळांनी पालना केले नाही, त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.



कॉपीबहाद्दर पर्यवेक्षक अन् केंद्र प्रमुखांवर कारवाई होणारच

१९ जणांविरुद्ध कठोर कारवाई प्रस्तावित

या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ जणांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षक आणि तिथल्या पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. इतर संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांवर संस्थांतर्गत शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यात बारावीच्या परीक्षा प्रगती पथावर आहेत, सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केलं होतं की, निर्भीडपणे परीक्षेला सामोरे जा. गुरुजींनी ज्ञान दानाचे काम केलं आहे. मुख्यमंत्री यांनी मुलांना सूचना दिल्या होत्या, त्यानुसार कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविले जात आहे. त्यामध्ये शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. महसूल विभाग, गृह, ग्रामविकास विभागाचे सहकार्य घेतले जाते, आढावा बैठक घेतली जाते. मात्र, जिथं कॉपीचे प्रकार घडले तिथे कारवाई करण्यात येईल, असे दादा भुसेंनी स्पष्ट केले.

गावठी भाषा, मॅनर्सलेस लोक... म्हणत मराठीचा अपमान

फिझिक्स वालाच्या शिक्षकाला मनसेने दिला चोप, व्हिडीओ व्हायरल

मुंबई। मराठी भाषेचा अपमान करणाऱ्या नाशिकमधील खासगी कोचिंग क्लासच्या एका शिक्षकाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी चांगलाच चोप दिला. येत्या आठ दिवसांत जर अमराठी शिक्षकांना परत पाठवले नाही तर मनसेस्टाईलचा हिसका दाखवला जाईल, असा दमही देण्यात आला.

शहरातील शरणपूर रोड परिसरातील फिझिक्स वाला या खासगी क्लासमध्ये हा प्रकार घडला. माहितीनुसार, क्लासमधील तीन ते चार विद्यार्थी आपसात मराठीत बोलत होते. त्यावेळी एका शिक्षकाने 'मॅनर्सलेस लोग है, गावठी भाषा में बात करते है' असे म्हणत मराठीचा अपमान केला. एक विद्यार्थी त्याच्या वडिलांशी मराठीत बोलत असताना त्यालाही 'ये कौन सी भाषा है, हिंदी में बात करो' असे सांगण्यात आले. त्यामुळे चिडलेल्या विद्यार्थ्यांनी तडक नाशिकमधील मनसेचे 'राजगड' कार्यालय गाठले. त्यानंतर मनसेचे कार्यकर्ते थेट क्लासमध्ये घुसले.




"इथे कमवतो, महाराष्ट्रात पोट भरतो तरी मराठीचा अपमान करतो...मराठीला गावठी बोलतोस लाज नाही वाटत का तुला..." असे म्हणत सदर शिक्षकाला चोप देत मनसे कार्यकर्त्यांनी जाब विचारला. तसेच, जर येत्या आठ दिवसांत अमराठी शिक्षकांना परत पाठवले नाही तर मनसेस्टाईलचा हिसका दाखवला जाईल, अशी धमकीही देण्यात आली. या क्लासमध्ये बहुतेक शिक्षक परप्रांतीय असून, हिंदी भाषेचा वापर सक्तीने केला जात असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासातही अडचणींचा सामना करावा लागतो. पण, लाख-दोन लाख फी भरल्यामुळे विद्यार्थी-पालक काही बोलत नाहीत. विद्यार्थ्यांना मराठी बोलण्यास प्रतिबंध केला जातो. काही विद्यार्थ्यांना या शिक्षकांचे हिंदी समजत नसल्याने त्याबाबत तक्रार केली असता, शिकायचे असेल तर हिंदीत शिका, अशी अरेरावी केल्याचेही मनसेचे म्हणणे आहे.

गेल्या वर्षी डबल अन् आता ट्रिपल मर्डर

पैशाचा पाऊस पाडणारा तांत्रिक 'असा' अडकला पोलिसांच्या जाळ्यात

मुंबई । पैशाचा पाऊस पाडण्याचं अमिष दाखवून एका ७२ वर्षीय मांत्रिकाने तिघांची हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. दिल्लीच्या पीरागढी भागातील ही घटना आहे. दिल्लीतील पश्चिम विहार ईस्ट पोलिसांना एका कारमध्ये तीन मृतदेह आढळून आले होते. सुरुवातीला पोलिसांना हा अपघात वाटला होता. मात्र पोलिसांनी तपासाची चक्रं फिरवली आणि सगळं सत्य समोर आलं. नेमकं काय घडलं, जाणून घेऊया. रविवारी पश्चिम विहार ईस्ट पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका कारमध्ये रणधीर, शिव नरेश आणि लक्ष्मी या तिघांचे मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळले होते. या घटनेमुळे संपूर्ण दिल्लीत खळबळ उडाली होती. डीसीपी सचिन शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी या ठिकाणाहून परतत असताना आरोपी कमरुद्दीनने या तिघांना तंत्र-मंत्राचा भाग म्हणून काही पदार्थ खायला दिले होते. प्रत्यक्षात त्या लाडूंमध्ये विष कालवले होते, ज्यामुळे या तिघांचा जागीच मृत्यू झाला. आरोपी कमरुद्दीन तंत्र-मंत्राच्या बहाण्याने लोकांचा विश्वास संपादन करायचा आणि त्यांच्याकडील रोकड व मौल्यवान वस्तू लुटण्यासाठी त्यांची हत्या करायचा. दिल्ली पोलिसांनी आता त्याच्यावर हत्या आणि लूटमारीचे गुन्हे दाखल केले असून अधिक चौकशी सुरू केली आहे. वारंवार अशा घटना घडूनही लोक अंधश्रद्धेला बळी पडून आपला जीव धोक्यात घालत आहेत, याबद्दल पोलिसांनी चिंता व्यक्त केली आहे. आरोपीला लवकरच न्यायालयात हजर केले जाणार आहे.



तपासादरम्यान धक्कादायक बाब समोर आली आहे की, अटक करण्यात आलेला कमरुद्दीन हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही दुहेरी हत्याकांडाचा गुन्हा दाखल आहे. मे २०२५ मध्ये उत्तर प्रदेशातील फिरोझाबाद जिल्ह्यातील मक्खनपूर येथेही त्याने अशाच प्रकारे दोन जणांची हत्या केली होती. तिथेही त्याने जमिनीतील गाडलेले धन काढून देण्याचे आमिष दाखवून रामनाथ आणि पुरन नावाच्या व्यक्तींना विषारी पदार्थ देऊन संपवले होते. त्या प्रकरणात त्याला अलाहाबाद उच्च न्यायालयातून जामीन मिळाला होता.

कातळशिल्पांच्या संशोधनासाठी 'वर्ल्ड हेरिटेज डेस्क' प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून १४ कोटी ६२ लाख रुपयांची तरतूद

मुंबई । कोकण किनारपट्टी आणि पठारावर आढळून आलेल्या हजाराहून अधिक कातळशिल्पांच्या (जिओग्लिफ्स) संशोधन, दस्तावेजीकरण आणि संवर्धनासाठी राज्य सरकारने 'वर्ल्ड हेरिटेज डेस्क' स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी एकूण १४ कोटी ६२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, हा डेस्क सन २०२६ ते २०२९ या कालावधीत कार्यरत राहणार आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने गुरुवारी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला.

कोकणातील कातळशिल्पे ही आद्य ऐतिहासिक मानवसंस्कृतीचा अमूल्य वारसा मानली जातात. या शिल्पांमधून हजारो वर्षांपूर्वीच्या मानवजीवन, सांस्कृतिक परंपरा आणि पर्यावरणीय संदर्भांचा अभ्यास करता येतो. या पार्श्वभूमीवर कातळशिल्पांच्या सखोल अभ्यासासाठी आणि 'युनेस्को' नामांकन प्रक्रियेला गती देण्यासाठी स्वतंत्र डेस्क उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी मनुष्यबळावर सुमारे २ कोटी ९४ लाख रुपये, वैज्ञानिक चाचण्या आणि सहकार्यासाठी ६ कोटी ३८ लाख रुपये, उपकरणे आणि पायाभूत सुविधांसाठी २ कोटी ६० लाख रुपये, वाहतूक खचार्साठी ८७ लाख रुपये, इतर खचार्साठी ४९ लाख रुपये तसेच १० टक्के प्रशासकीय अधिभारासाठी १ कोटी ३२ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

'वर्ल्ड हेरिटेज डेस्क'अंतर्गत मुंबई आणि रत्नागिरी येथे दोन शाखा कार्यरत असतील. मुंबई शाखा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कातळशिल्पांवरील साहित्याचा अभ्यास, ऐतिहासिक नकाशे, उपग्रह प्रतिमांचे विश्लेषण, डेटाबेस निर्मिती तसेच युनेस्कोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पद्धती आणि मानके विकसित करण्याचे काम करणार आहे. तसेच संशोधन लेख, परिषद सादरीकरणे आणि धोरणात्मक अहवाल तयार करण्याची जबाबदारीसुद्धा या शाखेवर असेल.

रत्नागिरी शाखा प्रामुख्याने क्षेत्रीय सर्वेक्षण, स्थळ पडताळणी आणि स्थानिक सहभागावर लक्ष केंद्रित करणार आहे. जीपीएस आधारित नकाशांकन, ड्रोनद्वारे छायाचित्रण, भौगोलिक आणि सांस्कृतिक संदर्भांचा अभ्यास, स्थानिक परंपरा आणि लोककथांचे संकलन तसेच स्थळांना असलेले धोके यांचे मूल्यांकन करून संवर्धनासाठी प्राथमिक शिफारसी करण्यात येणार आहेत.

मुंबईतील फेरीवाल्यांची खैर नाही

महापालिकेचा आतापर्यंतचा सर्वात कडक निर्णय, महापौरांचा थेट इशारा

मुंबई । मुंबई महानगरपालिकेतून वितरित करण्यात आलेल्या २३७ बोगस जन्मप्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. मुंबई महापालिकेने ही प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. पण तरीही अजूनही ती प्रमाणपत्रे अनधिकृत बांगलादेशी घुसखोरांच्या ताब्यात कशी? असा संतप्त सवाल रितू तावडे यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई न झाल्यास थेट सभागृहात प्रस्ताव आणण्याचा इशारा महापौरांनी दिला आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी नुकतंच पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना मुंबईतील फेरीवाल्यांवर कशाप्रकारे कारवाई केली जाणार आहे अशा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

मुंबईतील फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक फेरीवाल्याची आता कठोरपणे तपासणी केली जाणार आहे, असे रितू तावडे यांनी म्हटले. आतापर्यंत २३७ बोगस जन्मप्रमाणपत्र मुंबई महापालिकेने दिले आहे. हे जन्मप्रमाणपत्र त्यांनी रद्द केले आहेत. पण जे ओरिजनल जन्मप्रमाणपत्र अनधिकृत बांग्लादेशींकडे आहेत, ते अजून त्यांच्याकडून घेण्यात आलेले नाही.

जर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, तर त्यांच्याविरुद्ध सभागृहात प्रस्ताव आणावा लागेल. बांग्लादेशींना सांभाळण्याचे काम जर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून होत असेल, तर आम्हाला कडक कारवाई करावी लागेल, असा कडक इशारा रितू तावडे यांनी दिला.



मुंबईतील फेरीवाल्यांवर कशाप्रकारे कारवाई होणार?

तसेच मुंबईत जे कोणी फेरीवाले, फुटपाथवर बसतात, त्या सर्वांचे जन्मप्रमाणपत्र आम्ही चेक करणार आहोत. ती मोहीम आम्ही जोरदार हातात घेणार आहोत. त्यामुळे जे कोणी फेरीवाले आहेत त्यांचे जन्मप्रमाणपत्र कठोर पद्धतीने चेक केले जाणार आहेत. यावर कोणतीही माफी केली जाणार नाही, असे रितू तावडे यांनी सांगितले. कारण हा देशद्रोहाचा प्रकार आहे. तसेच ज्या कोणत्या बांग्लादेशींना सांभाळण्याचे काम अधिकारी करत असतील त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. हे करत असताना आम्ही प्रत्येक फेरीवाल्याचे जन्मप्रमाणपत्र, आधार कार्ड हे चेक केले जाईल, असेही रितू तावडे म्हणाल्या.

ठाकरे गटाच्या उप-तालुकाप्रमुखाच्या शेतात अफूची शेती

७२ लाख रुपये किमतीची अफूची झाडे जप्त



धाराशिव। धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपतालुकाप्रमुखाने कांदा पिकामध्ये बेकायदेशीररीत्या अफूची लागवड केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या कारवाईत ४८५ किलो ६५० ग्रॅम वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून, याची अंदाजे किंमत ७२ लाख ८४ हजार ७५० रुपये इतकी आहे. दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी वाशी तालुक्यातील मौजे दशमेगाव शिवारात एका शेतात लपूनछपून अफूची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सर्व्हे क्रमांक १६३, मौजे दशमेगाव येथे पाहणी केली असता कांदा पिकाच्या आंतरपिकामध्ये मोठ्या प्रमाणात अफूची लागवड आढळून आली. सदर अफूच्या झाडांना पांढऱ्या व गुलाबी रंगाची फुले तसेच मोठी बोंडे असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. हे शेत समाधान मनोहर उघडे (रा. दशमेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांचे असल्याचे निष्पन्न झाले असून, आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी त्यांनीच ही लागवड केल्याची माहिती पोलिसांना दिली. नायब तहसीलदार वाशी व दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत ही अफूची झाडे जप्त करण्यात आली.

या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ कलम ८ (क) व १८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार व वाशी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

ओमराजे निंबाळकरांच्या भूमिकेकडे लक्ष

धाराशिवचे ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर हे गेल्या काही काळापासून जिल्ह्यात अवैध व्यवसाय, दोन नंबरचे धंदे आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या विरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. विशेषतः तुळजापूर येथील भाजपाचे पदाधिकारी व तत्कालीन नगराध्यक्ष विनोद उर्फ पिंटू गंगणे यांच्या कथित ड्रग्जप्रकरणातील सहभागावरून ओमराजे निंबाळकर यांनी जाहीरपणे तीव्र विरोध दर्शवला होता. त्या वेळी त्यांनी आपल्या भाषणांत सांगितले होते की, दोन नंबर काम करणाऱ्या, समाजविघातक कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांना राजकारणात स्थान देऊ नका. आम्ही फक्त स्वच्छ चारित्र्याच्या लोकांनाच राजकारणात सोबत घेतो. मात्र आता त्यांच्याच पक्षाच्या वाशी उपतालुकाप्रमुखाच्या शेतात मोठ्या प्रमाणात अफूची शेती आढळून आल्याने राजकीय वतुर्ळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे अवैध व्यवसायांविरोधात ओमराजे निंबाळकर रान उठवत असतानाच, दुसरीकडे त्यांच्या पक्षातील पदाधिकाऱ्यावर इतका गंभीर गुन्हा उघडकीस आल्याने या प्रकरणात ओमराजे निंबाळकर काय भूमिका घेतात, पक्षांतर्गत कोणती कारवाई होते, याकडे संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे विशेषतः वाशी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

लेकीची बारावीची परीक्षा, वडिलांनी बाईक काढली अन् तेवढ्यात एक चूक...

नागपूर। सध्या बारावीची परीक्षा सुरु आहे. हीच बारावीची परीक्षा देण्यासाठी उत्साहाने घराबाहेर पडलेल्या एका विद्यार्थिनीचा आणि तिच्या वडिलांचा भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपूर जिल्ह्यातील मोहपा रोडवर ही घटना घडली. उमरेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी पुलाजवळ हा अपघात झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोहपा गावातील रहिवासी सुभाष केशव भिवणकर हे गुरुवारी सकाळी १०.३० च्या सुमारास आपली मुलगी तन्वी सुभाष भिवणकर आणि तिची मैत्रीण वंशिका ज्ञानेश्वर नरुळे यांना दुचाकीने उमरेड येथील परीक्षा केंद्रावर सोडण्यासाठी निघाले होते. बारावीची महत्त्वाची परीक्षा असल्याने तिघेही वेळेत पोहोचण्याच्या तयारीत होते. मात्र, एमआयडीसी पुलाजवळ समोरून येणाऱ्या गिट्टीने भरलेल्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातात सुभाष भिवणकर आणि त्यांची मुलगी तन्वी यांचा जागीच मृत्यू झाला.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com